# कला व वाणिज्य महाविद्यालय

नाव:- चिंचकर चैताली उत्तम

विषय:- LAW

मार्गदर्शक शिक्षक:- पोरमले सर

SEM: VI

Roll No - 315

Smart

Scanned with CamScanner

प्र कंपनीचे विसर्जन म्हणजे काय ? कंपनी न्यायाधीकरणाद्वारे होणारी कंपनी विसर्जन प्रक्रिया स्पष्ट करा ?

→ **कंपनीचे विसर्जन : अर्थ**

कंपनीच्या आयुष्यातील शेवटची अवस्था म्हणजे कंपनीची समाप्ती अथवा विसर्जन होय. कंपनी विसर्जन अवस्थेत कंपनीची मालमत्ता, येणे रक्कमा, व जिंदगी यांचे शेष रक्मेत रूपांतर करून त्यातून कंपनीची सर्व देणी प्रथम भागविली जातात व अतिरिक्त रकमेचा वापर भागधारकांच्या भागाची रक्कम भागाच्या प्रमाणात परत करण्यासाठी केला जातो.

कोणत्याही कंपनीचे विसर्जन कंपनी कायदा, 2013 नुसार पुढील दोन मार्गांनी करता येते.

१. कंपनी न्यायाधीकरणाद्वारे विसर्जन
2. कंपनीचे स्वेच्छेने विसर्जन

कंपनीचे न्यायाधीकरणाद्वारे विसर्जन होण्याची प्रक्रिया

भारतीय कंपनी कायदा, 2013 मधील कलम 271 ते कलम 302 नुसार कंपनीचे विसर्जन कंपनी न्यायाधिकरणामार्फत खालील प्रक्रियेने करता येते.

१. कंपनी विसर्जनासाठी याचिका : कंपनीचे न्यायाधिकरणामार्फत विसर्जन व्हावे यासाठी अशा अर्थाची याचिका स्वत: कंपनी, कंपनीचे धनको, कंपनी हक्कदार, कंपनी नोंदणी अधिकार, केंद्र सरकारद्वारा अधिकृत व्यक्ती तसेच कंपनीचे

कार्य देश अथवा समाजविघातक करत असल्यास केंद्र अथवा राज्य सरकार यांच्याद्वारे दाखल करण्यात आली पाहिजे.

2. कंपनी कामकाज अहवाल जमा करण्यासाठी निर्देश :
या द्वयात न्यायाधीकरण कंपनीला आपला कामकाज अहवाल तसेच विसर्जन याचिकेवरील त्यांचे आक्षेप त्या संबंधी निर्देशिलेल्या तारखेपासुन तीस दिवसांच्या मुदतीत दाखल करण्यासाठी सुचित करते.

3. न्यायाधीकरणाचा निर्णय :-
विसर्जनासाठी याचिका प्राप्तीनंतर ९० दिवसांच्या मुदतीत न्यायाधिकरणाने त्यावर निर्णय घेणे आवश्यक आहे तसेच विसर्जन आदेश देताना न्यायाधिकरणाने कंपनीला आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. कंपनी न्यायाधीकरणाने कंपनीला खालील परिस्थितीत कंपनी विसर्जनाचा निर्णय घेऊ शकते.

अ) कंपनी स्वत:ची देणी भागविण्यास असमर्थ असल्यास.
ब) न्यायाधीकरणामार्फत कंपनी विसर्जनासाठी कंपनीने विशेष संमत केला असल्यास.
क) कंपनीचे कार्य देशविघातक अथवा समाजविरोधी करत असल्यास
ड) कंपनी ही आजारी कंपनी असल्यास
इ) कंपनीची स्थापना व कार्य फसवणुक व बेकायदेशीर उद्देशासाठी असल्याचे तसेच तिचे व्यवस्थापन अधिकाऱ्यांचा गैरवापर व गैरवर्तनासाठी दोषी आहे. असे कंपनी नोंदणी अधिकार व शासनाच्या अर्जावर न्यायाधीकरणाचे मत झाल्यास.

४. कंपनी अवसायकाची नेमणूक :-

कंपनी न्यायाधीकरणाने कंपनी विसर्जनाचे आदेश दिल्यास अशा आदेशासोबत अधिकृत अथवा तात्पुरत्या कंपनी अवसायकाची नेमणूक करणे आवश्यक आहे. अवसायक नेमताना त्या संबंधीचे नियम, अटी तसेच त्याला देय शुल्क या गोष्टीसुद्धा न्यायाधीकरणाने स्पष्ट करणे गरजेचे आहे.

५. विसर्जन समितीची निर्मिती :-

कंपनी अवसायकाला अवसायन कार्यात मदत करण्यासाठी सदर टप्प्यात अवसायकाने विसर्जन समिती निर्मितीसाठी न्यायाधीकरणाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. सदर समितीत न्यायाधीकरणाशी निगडित अवसायक, हमीधारक, धनकोंव्दारे नामनिर्देशित व्यक्ती तसेच न्यायाधिकरणाव्दारे नामनिर्देशित तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश होतो.

६. अवसायकाच्या अहवालाचे सादरीकरण व न्यायाधीकरणाचे निर्देश :-

कंपनी विसर्जन आदेश प्राप्तीनंतर साठ दिवसांच्या मुदतीत व त्यानंतर गरज वाटेल तेव्हा कंपनी अवसायकाने आपल्या अवसायन कामाबाबतीत अहवाल न्यायाधीकरणाकडे सादर करणे.

७. न्यायाधिकरणाद्वारे कंपनीचे विसर्जन :-

कंपनी विसर्जनाबाबतीत आवश्यक कामकाज व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंपनी अवसायकाच्या अर्जावर कंपनी न्यायाधीकरण कंपनी विसर्जनाचा आदेश काढते. असा आदेश काढल्याच्या तारखेपासून कंपनी विसर्जित होते.

Smart

Scanned with CamScanner